स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठीचा सादर केलेला संशोधन आराखडा.

मराठवाड्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा 2011 ते 2024

संशोधक
डॉ.धनाजी दगडूराव खेबडे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. संजय मारोतीराव मुंडकर
(एम. ए. अर्थशास्त्र, एम. फिल, पीएच.डी.)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे विभाग
विद्यापीठ परिसर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जानेवारी 2024

अनुक्रमणिका

अ.क्र.	संशोधन आराखडयातील घटक	पृष्ठक्रमांक
1	प्रस्तावना	1-2
2	संशोधनाची गरज	3
3	संशोधनाचे महत्व	4
4	संशोधन समस्या विधान	5
5	पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या	5-6
6	संशोधनाची उद्दिष्टे	7
7	संशोधनाची गृहितके	7-8
8	संशोधन परिकल्पना	8
9	संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा	8-9
10	संशोधन पध्दती	9-10
11	जनसंख्या व न्यादर्श	11-12
12	संशोधन माहिती संकलनाची साधने	12-14
13	संशोधन माहिती विश्लेषणाची साधने	14
14	प्रकरण योजना	15
15	संदर्भ ग्रंथ सूची	16

1)प्रस्तावना:-

हाटकर ही भारतातील एक पशुपालक वयोध्दा जमात आहे. या जमातीस वेगवेगळया राज्यात वेगवेगळया नावांनी ओळखण्यात येते. उदा. हटकर, हाटकर, हट्टीधनगर, बरहट्टा, बरगे, बंडे, झेंडे, मेंढे, ढेलसी, तेलवर इत्यादी. ही जमात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, तेलंगणा या राज्यात बहुसंख्येनी आढळते.

हाटकर या शब्दाची व्युतपत्ती अचूकपणे सांगणे कठीण आहे. शां बा जोशी यांनी हाटकर या शब्दाचा अर्थ 'हट्टागार' असा सांगितलेला आहे. याचा अर्थ गुरेढोरे याचे पालन करणारा असा होतो. हाटकर हा शब्द कानडी भाषेतून आला असून, कानडी शब्दकोषात हाट्टी (हट्टी) म्हणजे गाई, बैल होय. तर हाटकर म्हणजे गाई-बैलांचा किंवा गुराढोरांचा सांभाळ करणारे मालक असा आहे. मराठी भाषेत हाटकर या शब्दाचा अर्थ हट+कर = जिद्द + करणारा म्हणजेच जिद्दी असणारा तो हाटकर असा होतो.

हाटकर या शब्दांचा पहिला लिखित उल्लेख 15 व्या शतकात झालेला आढळतो. अकबराने 'ऐन ए अकबरी' नामक ग्रंथ लिहिला. या ग्रंथात हाटकर योध्दया विषयी ते लिहितात की, "हाटकर हे स्वाभिमानी आहेत. ही एक राजपुतांसारखी पराक्रमी आणि घमंडी प्रकारची जात आहे. त्यांनी बाशिम (सध्याचे वाशिम) या ठिकाणी सशस्त्र सेना उभी केली आहे. त्यांच्याकडे 1000 घोडदळ आणि 500 पायदळ सैन्य आहे. या बळावर त्यांनी आजुबाजूचे राज्य व किल्ले कब्जात ठेवले आहेत. त्यांना हाटकर (धनगर) म्हणतात पण ते राजपूत आहेत हे खरे."

Captain Fitzgerald यांच्या अभ्यासानुसार, हाटकर ही जमात उत्तर हिंदुस्थानातून 13 व्या किंवा 14 व्या शतकात महाराष्ट्रात आली. हे बारा कुळीचे लोक एकत्र येवून यांनी हिंगोली व आजूबाजूच्या प्रदेशात बाराहट्टी नावाचे गाव तयार केले. यास बाराहट्टी देश असे सुध्दा म्हटले जायचे.

ब्रिटीश काळात इ. स. 1800 ते 1820 या काळात देखील या जमातीने इंग्राजांच्या विरोधात नांदेड, परभणी, हिंगोली व पैनगंगेच्या परिसरात धुमाकूळ घातला होता. हंसाजी नाईक हाटकर हा या लढयाचा प्रमुख होता. त्यांनी नोवा (नांदेड जिल्हा) हा भाग आपल्या ताब्यात ठेवला होता. इंग्रजानी दिनांक 08 जानेवारी 1819 रोजी या ठाण्यास वेढा दिला. इंग्रज व हंसाजी नाईक हाटकर यांच्यात तब्बल एक महिना संघर्ष सुरु होता. हंसाजी नाईक हाटकर हे तब्बल एक महिना इंग्रजा सोबत लढत होते. अखेर हा लढा मोडीत काढण्यात इंग्रजाना यश आले.

निजामांच्या काळात देखील हाटकर समाजाचा दरारा होता. हाटकर ही पुर्वी पासूनच एक लढवय्या जमात आहे. हाटकर समाजाकडे पुर्वीपासूनच एक धाडसी, शूर, वीर जमात म्हणून पाहिले जाते. हाटकर जेंव्हा लढाई वर निघायचे तेंव्हा त्यांच्या खांद्यावर सात हात लांब घोंगडी, एका हातात ध्वज व दुसऱ्या हातात अस्वल भाला किंवा तलवार असायची. हाटकरांचा एक स्वतंत्र ध्वज आहे. ज्या ध्वजात पिवळा व लालसर रंग आहे. छातीवर वार घेणे व विजयासाठी शहिद होणे यास हाटकर समाज अभिमानाची बाब समजतात. त्यामुळेच हाटकर जमातीतील स्त्री-पुरुष शारीरिक दृष्टया धष्टपुष्ट होती.

प्राचीन इतिहासातील चालुक्य व होयसळ राजघरण्यात हाटकर समाजाचे अनेक सेनापती असल्याचा उल्लेख शिलालेखात आहे. महाराष्ट्रात देखील हाटकरांची अनेक सरदार घराणे असल्याची पहावयास मिळतात. जसे की, धायगुडे, राजेपांढरे, देवकाते, राजेसरगर, मासाळ, हांडे, थोरात, होडगीर, इत्यादी.

महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र शासनाने हाटकर समाजास भटक्या जमाती (NT) या प्रवर्गात समाविष्ट केले आहे. एन. टी. प्रवर्गासाठी एकूण 11% सामाजिक व शैक्षणिक आरक्षण असून, या आरक्षणातील एन. टी. (क) या प्रवर्गासाठी 3.5% आरक्षणाची तरतुद आहे. या प्रवर्गात हाटकर या जातीसह इतर आणखीन 24 जाती समाविष्ट आहेत. आज महाराष्ट्रासह मराठवाडयात हाटकर समाज पशुपालन या सह शेती हा व्यवसाय करत आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात समाजाची वाढती लोकसंख्या, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक बदल यामुळे या समाजा समोर अनेक आव्हाने तयार झाली आहेत. शेतीचे छोटयाछोटया तुकडयात झालेले विभाजन, स्वातंत्र्यत्तोर काळातील शासनाचे वनधोरण, निरक्षरता, अज्ञान, महागाई, दारिद्रय यांसारख्या अनेक प्रश्नांमुळे हा समाज जर्जर झाला आहे. त्यामुळे या समाजाच्या उन्नतीकरिता, यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा सखोल अभ्यास करुन त्यावरती उपाय योजना सुचविणे खूपच गरजेचे आहे. याच उद्देशातून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

2) संशोधनाची गरज :-

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. काळाच्या प्रवाहासोबत अनेक बाबतीत बदल घडून येतात. यातील काही बदल हे हितकारक तर काही बदल अहितकारक ठरत असतात. त्यामुळे काळाच्या प्रवाहासोबत सामाजिक परिवर्तनातील बदल वेळोवेळी समजून घेणे आवश्यक ठरते.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणणे सहज शक्य असते. सामाजिक परिवर्तनामधून समाजाभिमुख, विकासाभिमुख समाज तयार करता येतो. जसे की, समाजाची सद्यःस्थिती काय आहे ? समाजा समोरील प्रमुख आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक समस्या कोणत्या ? समाजासमोर या समस्या निर्माण होण्यासाठी कोणती कारणे कारणीभूत आहेत ? या समस्या सोडविण्यासाठी काय उपाय योजना करता येतील या संपुर्ण बाबींचा शास्त्रशुध्द अभ्यास संशोधनातूनच करता येतो. त्यामुळे संशोधनाची गरज असते.

अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे. समाजाच्या, व्यक्तीच्या आर्थिक वर्तणूकीचा अभ्यास या शाखेमधून केला जातो. व्यक्तीच्या जीवनात आर्थिक घटकास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे हाटकर समाजाची सर्वांगीण स्थिती समजून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटते. प्रस्तुत संशोधनाची गरज पुढील प्रमाणे विशद करता येईल.

संशोधनाची गरज:-

i) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाची आर्थिक सद्यःस्थिती समजून घेणे.

ii) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाची सामाजिक सद्यःस्थिती समजून घेणे.

iii) हाटकर समाजाच्या आर्थिक स्थितीची राज्यातील इतर समाजाच्या आर्थिक स्थिती सोबत तुलना करणे.

iv) हाटकर समाजाच्या आर्थिक उत्पन्नाचे स्रोत अभ्यासणे.

v) हाटकर समाजाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे.

vi) हाटकर समाजा समोरील आर्थिक समस्येवर उपाय योजना सुचविणे.

3) **संशोधनाचे महत्त्व :-**

हाटकर समाज हा महाराष्ट्र आणि मराठवाडा प्रातांतील अधिसंख्येनी असणारा समाज. पिढयां पिढया पासून गुरां-ढोरा चा सांभाळ करणारा, काळया आईची सेवा करणारा हा समाज. प्राचीन काळापासून सैन्यामध्ये सक्रीय असणारा, शूर, वीर आणि धाडसी समाज. काळ बदलला तसा समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीवर परिणाम होत गेला. पुर्वी हाटकर समाजामधील अनेक घराण्यांकडे विविध राजघराण्याची सरदारकी होती. समाजातील अनेक युवक राज सैन्यात घोडदळ, पायदळ या पदावर होते. समाजातील अनेक परिवारांकडे गाई, बैल, म्हैस, शेळया, मेंढया यासारखी पुशधन होती. त्यामुळे समाजाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती देखील उत्तम होती.

काळाचा प्रवाहासोबत राजेशाही लोप पावली आणि या समाजातील लोकांची सरदारकी गेली. लढाया बंद झाल्या आणि सैनिक म्हणून मिळायचा पगार बंद झाला. भारतात ब्रिटीशांचे आगमन झाले आणि या देशातील तत्कालीन विविध कर रद्द झाले. भारत स्वतंत्र झाला, स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक उपयुक्त कायदे पारित करण्यात आले. यात जमीनीचा कायदा, वनकायदा, आरक्षणाचा कायदा इत्यादी. यामुळे या समाजाच्या शेत जमीनीचे छोटया छोटया तुकडयात विभाजन झाले. वन कायद्यामुळे गायरान किंवा शासकीय जमीनीवर वनीकरण करुन त्या जमीनी वन विभागाकडून संरक्षित करण्यात आल्या, यामुळे गुराढोरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होवून झपाटयाने त्यांची संख्या कमी झाली. निरक्षरता, अल्पशिक्षण, रुढी, प्रथा, परंपरा, अज्ञान या कारणांमुळे हा समाज काळा सोबत स्वत:त बदल घडविण्यात अपयशी ठरला. आरक्षण मर्यादेमुळे सर्वांना नोकरीची संधी मिळणे कठीण झाले. या सर्व परिस्थितीत एकेकाळी सशक्त, बलशाली, आर्थिकदृष्टया सुसंपन्न असणारा हा समाज आज 21 व्या शतकात, जागतिकीकरणाच्या काळात प्रचंड आर्थिक संकटात सापडला. आज समाजा समोर अनेक आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय प्रश्न आवासून उभे आहेत. त्यामुळे या समाजाचे प्रश्न तत्काळ समजून घेवून ते सोडविण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे. अन्यथ: हा समाज दारिद्रय रेषेच्या खाली जाण्यास फारसा वेळ लागणार नाही. याच कारणांसाठी या समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

4) **संशोधन समस्या विधान :-**

मराठवाड्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ नांदेड जिल्हा 2011 ते 2024.

5) **पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :-**

5.1) **मराठवाडा :-**

1) महाराष्ट्र राज्यामधील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, बीड आणि धाराशिव या आठ जिल्हयांनी मिळून तयार झालेला प्रादेशिक विभाग

2) महाराष्ट्र राज्यातील सहा प्रशासकीय विभागापैकी एक असणारा विभाग.

5.2) **हाटकर :-**

हाटकर म्हणजे गाई-बैलांचा किंवा गुरा-ढोरांचा सांभाळ करणारे मालक

5.3) **समाज :-**

1) परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांची मिळून बनलेली एक व्यापक संघटना म्हणजे समाज होय.

2) समान ध्येय आणि अकांक्षा असणाऱ्या, एका विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकांचा समुह म्हणजे समाज होय.

5.4) **आर्थिक :-**

1) पैशा संबंधी बाबीं म्हणजे आर्थिक बाबी होय.

5.5) **सामाजिक :-**

1) समुदाय किंवा समाजातील आंतरसंबंधाचा अभ्यास

2) समुदायामधील एकमेकांचे एकमेकांसोबतचे सहकार्य म्हणजे सामाजिक होय.

5.6) **नांदेड जिल्हा :-**

मराठवाडा विभागातील एक जिल्हा.

5.7) **स्थिती :-**

वर्तमान काळातील अवस्था म्हणजे स्थिती होय.

5.8) **चिकित्सक :-**

1) चौकस पणाने पाहणी करणे म्हणजे चिकित्सक होय.

2) विषयाच्या सर्वांगीण बाबींचा अभ्यास करणे.

5.9) **अभ्यास :-**

एखाद्या विषयाच्या सर्व अंगाचे ज्ञान व्हावे म्हणून बारकाईने करण्यात येणारे अवलोकन म्हणणे अभ्यास किंवा अध्ययन होय.

6) **संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) हाटकर समाजाच्या आर्थिक सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

2) हाटकर समाजाच्या सामाजिक सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

3) हाटकर समाजाच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत अभ्यासणे.

4) हाटकर समाजाच्या आर्थिक समस्यांचा शोध घेणे.

5) हाटकर समाजाच्या आर्थिक समस्येस कारणीभूत कारणांचा शोध घेणे.

6) हाटकर समाजाच्या आर्थिक समस्या निर्मूलणासाठी उपाययोजना सूचविणे.

7) हाटकर समाजाच्या सामाजिक समस्यांचा शोध घेणे.

8) हाटकर समाजाच्या सामाजिक समस्या निर्मूलसाठी उपाययोजना सूचविणे.

7) **संशोधनाची गृहितके:-**

1) हाटकर समाज हा महाराष्ट्रासह मराठवाडयात बहुसंख्येनी वास्तव्य करणारा समाज आहे.

2) महाराष्ट्र राज्यात हाटकर समाजाचा समावेश एन. टी. (क) या प्रवर्गात आहे.

3) महाराष्ट्रात एन. टी. (क) प्रवर्गासाठी शैक्षणिक व सामाजिक बाबींसाठी 3.5%जागा राखीव आहेत. या प्रवर्गात हाटकर जातीसह एकूण 25 जाती आहेत.

4) पशुपालन व कृषी हा हाटकर समाजाचा पारंपरिक व प्रमुख व्यवसाय आहे.

5) हाटकर समाजा समोर सद्यस्थितीत अनेक आर्थिक व सामाजिक समस्या आहेत.

8) **संशोधन परिकल्पना :-**

1) महाराष्ट्र राज्यात हाटकर समाज इतर सामाजिक प्रवर्गाच्या तुलनेत, सद्यस्थितीत आर्थिकदृष्टया मागास आहे.

2) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजासमोर अनेक आर्थिक समस्या आहेत.

3) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित आहेत.

4) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाज सामाजिक दृष्टया मागास आहे.

5) नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजासमोर अनेक सामाजिक समस्या आहेत.

9) **संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-**

9.1) **संशोधनाची व्याप्ती :-**

1) **विषय व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधन मराठवाडयातील विशेषत: नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास या विषयांईतपतच व्यापक असेल.

2) **आशय व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधन मराठवाडयातील विशेषत: नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती, आर्थिक व सामाजिक समस्या, समस्येस कारणीभूत घटक, आर्थिक समस्येवर करता येऊ शकणाऱ्या उपाय योजना या आशय पुरतेच व्यापक असेल.

iii) काळ व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हीच संशोधनाची काळव्याप्ती असेल.

9.2) संशोधनाची मर्यादा :-

1)**विषय मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन मराठवाडयातील विशेषत: नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास या विषया पुरतेच मर्यादित असेल.

2)**आशय मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधन मराठवाडयातील विशेषत: नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक समस्येस कारणीभूत विविध घटक, आर्थिक व सामाजिक समस्या निर्मुलनासाठीच्या विविध उपाय योजना या आशया पुरतेच मर्यादित असेल.

3)**काळ मर्यादा :-**

प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हीच संशोधनाची काळ मर्यादा असेल.

10) संशोधन पध्दती :-

मराठवाडयातील विशेषत: नांदेड जिल्ह्यातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास. या संशोधन विषयाच्या संशोधन कार्यासाठी संशोधनाची सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवडण्यात आली आहे.

10.1) सर्वेक्षण संशोधन पध्दती :-

वर्तमान काळातील किंवा सद्यस्थितीतील समस्यांचा अभ्यास करुन, त्याची शास्त्रीय पध्दतीने सोडवणूक करण्यासाठीची एक उपयुक्त संशोधन पध्दती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय. या पध्दतीद्वारे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी माहिती संकलन, विश्लेषण आणि मुल्यांकन करता येते.

व्याख्या:-

1) वर्तमान काळातील संशोधन समस्येशी संबंधित असणारी संशोधन पध्दती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय.

2) समाजातील विविध समुदायाची सद्यस्थिती, त्यांचे विविध प्रश्न, मते, कल्पना, विचार समजून घेण्या संदर्भात उपयुक्त असणारी संशोधन पध्दती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय.

3) प्रश्नावली तंत्राचा उपयोग करुन जनमताचे मापन करणारी संशोधनाची शास्त्रीय पध्दती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय.

4) वेबस्टर यांच्या शब्दकोशानुसार "सर्वेक्षण म्हणजे एक टिकात्मक निरीक्षण होय. ज्याचा उद्देश एका क्षेत्रातील कोणत्याही एका स्थिती किंवा प्रचलणाच्या संबधात यथार्थ सूचना प्राप्त करणे हा आहे."

10.2) सर्वेक्षण संशोधन पध्दती निवडण्याची कारणे :-

1) सर्वेक्षण संशोधन पध्दतीच्या माध्यमातून सद्य स्थितीचा किंवा वर्तमान कालीन समस्येचा अभ्यास करता येतो. प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी निगडीत असल्यामुळे सदरील संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली.

2) मोठया जनसंख्येचा अभ्यास करण्यास उपयुक्त असणारी संशोधन पध्दती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय. प्रस्तुत संशोधन हे मराठवाडा विभागा अंतर्गत एकूण आठ जिल्हयात (विशेषत: नांदेड जिल्ह्यात) वास्तव्य करणाऱ्या हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेण्याशी संबंधीत आहे. त्यामुळे संशोधनाची जनसंख्या मोठी आहे. या कारणांसाठी म्हणून या संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली.

3) सर्वेक्षण या संशोधन पध्दतीद्वारे गुणात्मक व संख्यात्मक संशोधन करता येते. प्रस्तुत संशोधनासाठी हाटकर समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती समजून घेवून, त्यावरती उपाय योजना सूचविण्यासाठी संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही बाबींची आवश्यकता होती. त्यामुळे प्रस्तुत संशोधन सर्वेक्षण संशोधन पध्दतीद्वारेच पुर्ण करता येवू शकते, या कारणामुळे या संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली.

4) सर्वेक्षण संशोधन पध्दतीद्वारे संशोधन माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत,निरीक्षण यासारख्या विविध साधनांचा वापर केला जातो. प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनासाठी प्रश्नांवली व मुलाखत ही साधने वापरणे आवश्यक होते. त्यामुळे या संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली.

5) सर्वेक्षण संशोधन पध्दती ही एक शास्त्रीय पध्दती आहे. या संशोधन पध्दती संशोधनाच्या सर्व पायऱ्यांचा उपयोग होतो. त्यामुळे संशोधन शास्त्रीय व अचूकरित्या पुर्ण करण्यासाठी ही संशोधन पध्दती निवडण्यात आली.

11) **जनसंख्या :-**

संशोधनाशी संबंधित एकूण किंवा समग्र संख्या म्हणजे संशोधन जनसंख्या होय. प्रस्तुत मराठवाडयातील हाटकर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास या संशोधन विषयाची जनसंख्या नांदेड जिल्ह्यात वास्तव्यास असणारा संपुर्ण हाटकर समाजही आहे.

नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालूके आहेत. या तालुक्यातील हाटकर समाजाची संख्या ही संशोधनाची जनसंख्या आहे.

न्यादर्श :-

समग्र जनसंख्ये मधून संशोधनासाठी निवडण्यात येणारा छोटासा किंवा प्रतिनिधिक भाग म्हणजे न्यादर्श होय. जनसंख्येतील काही प्रतिनिधीक एककांची संशोधन अभ्यासाठी न्यादर्श म्हणून निवड करण्यात येते. हा न्यादर्श जनसंख्येचे तंतोतंत प्रतिनिधत्व करत असतो.

11.1) **न्यादर्श निवड :-**

जनसंख्येतून न्यादर्श निवडण्यासाठी दोन पध्दतीचा वापर करण्यात येतो.

1) संभाव्य नमुना निवड

2) असंभाव्य नमुना निवड.

या विषयीची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे

नमुना निवड पध्दती	
संभाव्य नमुना निवड पध्दती	**असंभाव्य नमुना निवड पध्दती**
1) साधी किंवा यादृच्छिक नमुना निवड	1) सोयीस्कर नमुना निवड
2) स्तरीय यादृच्छिक नमुना निवड	2) सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड
3) व्यवस्थाबध्द नमुना निवड	3) कोटा नमुना निवड
4) बहुस्तरीय नमुना निवड	4) स्वंय निर्वाचित नमुना निवड

11.2) **प्रस्तुत संशोधनासाठी नमुना निवड :-**

प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्य नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. असंभाव्य नमुना निवड पध्दतीतील सहेतूक नमुना निवड पध्दतीच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील एकूण १६ तालूक्यापैकी ८ तालूक्याची निवड व त्यातील हाटकर समाजातील लोकसंख्येची निवड न्यादर्श म्हणून करण्यात आली आहे.

11.3) **न्यादर्शात निवडण्यात आलेली तालुके**

न्यादर्श : नांदेड जिल्ह्यातील तालुके			
1) नांदेड	2) मुखेड	3) देगलूर	4) कंधार
5) लोहा	6) हादगाव	7) भोकर	8) किनवट

11.4) **सहेतूक नमुना निवड पध्दती निवडण्याची कारणे :-**

नांदेड जिल्हयात एकूण सोळा तालुक्यांचा समावेश आहे. यांची काही तालुक्यात संख्या अधिक आहे तर काही तालुक्यात संख्या कमी आहे. त्यामुळे ज्या तालुक्यात हाटकर समाज अधिक संख्येनी आहे अशा तालुक्याची निवड करण्यासाठी नमुना निवड पध्दतीतील सहेतूक नमुना निवड पध्दती उपयुक्त होती. त्यामुळे या पध्दतीचा वापर करुन नमूना निवड करण्यात आली.

12) संशोधन माहिती संकलनाची साधने :-

संशोधन माहिती संकलन साधनांची गुणात्मक साधने व संख्यात्मक साधने असे दोन प्रमुख प्रकार पडतात. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी गुणात्मक संशोधन साधनाची निवड करण्यात आली आहे. या साधन प्रकारां विषयीची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे.

12.1) प्रश्नावली :-

संशोधन समस्येचे स्वरुप व माहिती संकलनाचा आशय पाहता, प्रश्नावली हे माहिती संकलनाचे साधन अत्यंत उपयुक्त आहे.

संशोधन विषया संदर्भात एखाद्या व्यक्तींकडून माहिती मिळविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात येणारी प्रश्नांची क्रमबध्द सूची म्हणजे प्रश्नावली होय. प्रश्नावली उत्तरदाता स्वत: भरत असतो प्रश्नावली भरुन पाठवण्यासाठी ई-मेल, पोस्ट, कुरियर, व्हॉटसअप या माध्यमांचा आधार घेता येतो.

व्याख्या :-

गुड आणि हॅट यांच्या मते "सामान्य रुपात प्रश्नावली म्हणजे, प्रश्नांची लिखित उत्तरे प्राप्त करुन घेण्याची एक पध्दती आहे. यातील प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वत: भरतो."

प्रश्नावली साधन निवडण्याचे कारण :-

1) दूर अंतरावर पसरलेल्या प्रतिसादकां कडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी.

2) लिखित प्रतिसाद प्राप्त करुन घेण्यासाठी.

3) निपक्षपाती व वस्तुनिष्ठ प्रतिसाद प्राप्त करुन घेण्यासाठी.

4) उद्दिष्टांनुरुप प्रतिसाद मिळविण्यासाठी

5) अधिकाधिक प्रतिसादकांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी.

12.2) मुलाखत :-

सामाजिक संशोधनात मुलाखत हे तथ्य संकलनाचे अत्यंत उपयुक्त साधन आहे. मुलाखतीच्या माध्यमातून प्रतिसादकाचे आंतरिक दृष्टिकोन व विचार समजून घेता येतात.

व्याख्या :-

1) एम. एन. बसू, यांच्या मते "काही विषयांवर व्यक्तीची समोरा समोर झालेली बैठक म्हणजे मुलाखत होय."

2) समोरच्या व्यक्तीच्या मनातील विचार भावना, प्रवृत्ती, संवेग या बाबीं प्रत्यक्ष संवाद आणि चर्चेच्या माध्यमातून जाणून घेण्याचे तंत्र म्हणजे मुलाखत होय.

मुलाखत साधन निवडण्याची कारणे :-

1) अशिक्षित प्रतिसादकाचा प्रतिसाद मिळविण्यासाठी

2) प्रतिसादकाच्या मनातील विचार, भावना, संवेग विस्तृतपणे समजून घेण्यासाठी.

3) प्रत्यक्ष प्रतिसादकांशी भेटून महितीचे संकलन करण्यासाठी.

4) प्रतिसादकांच्या मनातील मानसिक व मनो वैज्ञानिक बाबीं माहित करुन घेण्यासाठी.

5) सखोल व सुक्ष्मपणे माहितीचे संकलन करण्यासाठी.

13) माहिती विश्लेषणाची साधने :-

प्रश्नावली, मुलाखत या दोन संशोधन साधनाद्वारे संकलित माहितीचे विश्लेषण करण्याकरिता माहिती विश्लेषणाची शेकडेवारी आणि टी परिक्षिका या दोन सांख्यिकीय परिमाणांचा वापर करण्यात येणार आहे.

13.1) **शेकडेवारी :-**

शेकडेवारीस शतमान पध्दती किंवा टक्केवारी असे देखील म्हणतात. शेकडेवारी या माहिती विश्लेषण साधनाच्या माध्यमातून माहितीचे विश्लेषण करण्यासाठी प्राप्त प्रतिसादास शंभरणे भागण्यात येते.

शेकडेवारीचे सूत्र : $\frac{\text{प्राप्त प्रतिसाद}}{\text{एकूण प्रतिसाद}}$

13.2) **टी परीक्षिका :-**

टी परीक्षिका ही एक सांख्यिकीय चाचणी आहे. या चाचणीच्या माध्यमातून दोन गटाच्या प्राप्त प्रतिसादाची सुक्ष्मतुलना करता येते. ही एक पॅरामेट्रिक चाचणी आहे.

टी परीक्षिकेचे सूत्र $t \frac{D}{SEd}$

14) **प्रकरण योजना :-**

संशोधन अहवाल लेखन करण्यासाठी पाच प्रकरणाची योजना केली आहे. ती पुढील प्रमाणे

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणातून प्रस्तावना, संशोधन समस्येची गरज व महत्त्व, संशोधन समस्या विधान, संशोधनातील पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधन उद्दिष्टे, परिकल्पना, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा या बाबींचा समावेश असेल.

14.2) **प्रकरण दुसरे :- गत संशोधन व संबंधित साहित्याचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणा मधून संशोधनाशी संबंधित यापुर्वी झालेले संशोधन प्रबंध, शोधनिबंध, संबंधित प्रकाशित साहित्य याचा आढावा घेण्यात येणार आहे. सोबतच गत संशोधन व प्रस्तुत संशोधन यांच्यातील वेगळेपण मांडण्यातये ईल.

14.3) **प्रकरण तिसरे :-संशोधन कार्य पध्दती**

या प्रकरणातून संशोधना साठीची निवडण्यात आलेली संशोधन पध्दती, संशोधन पध्दतीच्या निवडीची कारणे, संशोधन माहिती संकलनाची साधने, संशोधन माहिती विश्लेषणाची साधने, संशोधन कार्य पध्दती या विषयीची माहिती देण्यात येईल.

14.4) **प्रकरण चौथे :-माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन**

प्रस्तुत प्रकरणातून माहिती संकलनाच्या प्रश्नावली व मुलाखत या दोन साधनाद्वारे प्राप्त माहिती वर शेकडेवारी आणि टी परीक्षिका या माहिती विश्लेषण साधनांद्वारे विश्लेषण करुन त्यांचे अर्थ निर्वचन करण्यात येईल. यासाठी तक्ता, आलेख व आलेख चित्रे याचा वापर केला जाईल.

14.5) **प्रकरण पाचवे :-सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

या प्रकरणामधून माहिती विश्लेषण व अर्थ निर्वचनाद्वारे प्राप्त तथ्यांवर निष्कर्ष मांडण्यात येतील. निष्कर्षाच्या आधारावर काही महत्त्व पुर्ण शिफारशी सूचविण्यात येतील. सोबतच पुढील संशोधनासाठी काही संशोधन विषय दिले जातील. शेवटी संदर्भ ग्रंथ सूची देण्यात येईल.

15) संदर्भ ग्रंथ सूची :-

1) सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे

- डॉ. प्रदीप आगलावे (श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर)

2) संशोधन पध्दती मूलभूत संकल्पना -प्रो. डॉ. सुहास डी.आव्हाड, डॉ .शिवाजी के. ढगे, डॉ. वैशाली डी. पाटील, प्रा. रामा बी. माने, प्रा. अक्षय एस. काळे (प्रशांत पब्लिकेशन)

3) संशोधन पध्दती - डॉ. वा. भा. पाटील (प्रशांत पब्लिकेशन)

4) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, ॲड. मृणाल कुलकर्णी (श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर)

5) होळकरशाहीचा इतिहास - वा. वा. ठाकूर, डॉ. देविदास पोटे (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.)

6) भटक्या धनगर समाजाचे वास्तव - अभिजीत कैलासराव नजन (चिन्मय प्रकाशन)

7) भारतीय समाजातील दारिद्रय - डॉ. कालिदास भांगे (चिन्मय प्रकाशन)

8) धनगरांचा गौरवशाली इतिहास - संजय सोनवणी (प्राजक्त प्रकाशन)

9) महाराष्ट्रातील निवडक जाती - जमाती - डॉ. एस. जी. देवगावकर (श्री साईनाथ प्रकाशन)

10) आपला जिल्हा (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव) - (कल्पना प्रकाशन, नांदेड.)

मार्गदर्शक **संशोधक**

प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर **डॉ. धनाजी दगडूराव खेबडे**

(एम.ए.अर्थशास्त्र, एम.फिल, पीएच.डी.)

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर

15) **संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे

- डॉ. प्रदीप आगलावे (श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर)

2) संशोधन पध्दती मूलभूत संकल्पना -प्रो. डॉ. सुहास डी.आव्हाड, डॉ .शिवाजी के. ढगे, डॉ. वैशाली डी. पाटील, प्रा. रामा बी. माने, प्रा. अक्षय एस. काळे (प्रशांत पब्लिकेशन)

3) संशोधन पध्दती - डॉ. वा. भा. पाटील (प्रशांत पब्लिकेशन)

4) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, ॲड. मृणाल कुलकर्णी (श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर)

5) होळकरशाहीचा इतिहास - वा. वा. ठाकूर, डॉ. देविदास पोटे (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.)

6) भटक्या धनगर समाजाचे वास्तव - अभिजीत कैलासराव नजन (चिन्मय प्रकाशन)

7) भारतीय समाजातील दारिद्रय - डॉ. कालिदास भांगे (चिन्मय प्रकाशन)

8) धनगरांचा गौरवशाली इतिहास - संजय सोनवणी (प्राजक्त प्रकाशन)

9) महाराष्ट्रातील निवडक जाती - जमाती - डॉ. एस. जी. देवगावकर (श्री साईनाथ प्रकाशन)

10) आपला जिल्हा (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव) - (कल्पना प्रकाशन, नांदेड.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर

(एम.ए.अर्थशास्त्र, एम.फिल, पीएच.डी.)

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर

संशोधक

डॉ. धनाजी दगडूराव खेबडे